# बृहन्मुंबई गणित अध्यापक मंडळ, मुंबई

जी १, पार्ले गंगा निकेतन को ऑप. हा. सो., सुभाष क्रॉस रोड, तुकाराम सांडम मार्ग,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०५७. टेलिफोन नं २६८२ ७६५१ (वेळ स. ११.०० ते दुपारी ३.००)
वेब साईट : www.mumbaiganitmandal.com ● ई–मेल : mumbaiganitmandal@gmail.com


## गणित संबोध परीक्षा परिपत्रक २०१७

मा. मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका **दि. १० जून २०१७**
महोदय/महोदया,

सप्रेम नमस्कार,

बृहन्मुंबई गणित अध्यापक मंडळ गेल्या ३७ वर्षाहून अधिक वर्षे **गणित संबोध परीक्षा** इ. ५वी **आणि** इ. ८वी साठी आयोजित करीत आहे. इ. ५वी आणि इ. ८वी मध्ये शिकत असलेल्या कोणत्याही विद्यार्थ्याला या परीक्षेला बसता येईल. **मागील इयत्तेत नेमलेल्या अभ्यासक्रमातील मूलभूत गणिती संबोध आणि महत्त्वाच्या संकल्पना किती समजल्या आहेत हे अजमावता यावे आणि त्यानुसार आवश्यक ती उपाय योजना करुन विद्यार्थ्यांची प्रगती साधता यावी. हा या परीक्षेचा मुख्य उद्देश आहे.**

परीक्षेसंबंधी माहिती पुढे दिली आहे.

१) परीक्षेची तारीख : शनिवार, दिनांक २९ जुलै २०१७
परीक्षेची वेळ : दुपारी ३ ते ५

२) माध्यम : मराठी, इंग्रजी, हिन्दी, गुजराथी, उर्दू

३) परीक्षा शुल्क : रु. १००/ प्रत्येक विद्यार्थ्यासाठी (महानगर पालिकेच्या शाळातील विद्यार्थ्यांसाठी रु. ५०/–)

४) परीक्षा केंद्र : या परीक्षेस वैयक्तिक प्रवेश दिला जात नाही. शाळेमार्फतच इ. ५वी व इ. ८वी प्रत्येकी किमान ३० विद्यार्थी येणे आवश्यक. प्रत्येक शाळा हेच स्वतःच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी परीक्षा केंद्र असेल.

५) **परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नावाच्या याद्या २ प्रतीत इंग्रजी कॅपिटल लेटर्समध्ये इयत्तावार आणि माध्यमवार वेगवेगळया पाठवाव्यात. तसेच एक प्रत excel sheet मधे वेबसाईटवर दाखवल्यानुसार 'bmgams14@gmail.com' मेल करावी. (विद्यार्थ्यांच्या याद्या सोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे असाव्यात.) विद्यार्थ्यांचे परीक्षा बैठक क्रमांक दि. २५ जुलै २०१७ पर्यंत शाळांच्या ई–मेलवर पाठविले जातील.**

६) परीक्षार्थींची यादी करणे, परीक्षा शुल्क जमा करणे या कामासाठी व याद्या, पेपर्स आणणे, प्रवास खर्च यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांमागे रु. २० प्रमाणे रक्कम शाळेने खर्चासाठी स्वतःकडे ठेऊन बाकी हिशोबानुसार फी ची एकूण रक्कम मंडळाकडे भरावी. महानगर पालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांचे पैसे प्रत्येकी रु. ४०/ प्रमाणे पाठवावे. इतर शाळांतील विद्यार्थ्यांचे पैसे प्रत्येकी रु. ८०/– प्रमाणे पाठवावे. फी ची एकूण रक्कम **बृहन्मुंबई गणित अध्यापक मंडळ, मुंबई यांच्या खात्यात पुढे दिलेल्या A/C No. 284200100972273, IFSC CODE : SRCB0000284 of Saraswat Co-Op. Bank Vile-Parle (E).** फी भरल्याची पावती आणि विद्यार्थ्यांच्या नावाच्या याद्या दोन प्रतीत मंडळाच्या पत्त्यावर **२८ जून २०१७ ते ४ जुलै २०१७** पर्यंत पोचतील अशा कुरिअर कराव्या.

७) **केंद्र शाळांना परीक्षा साहित्य २४ जुलै २०१७ ते २६ जुलै २०१७ या दिवसांत शाळेमध्येच पोहचते करण्यात येईल.**

कृपया मागे पहा

८) विद्यार्थ्यांच्या याद्या पाठविल्यानंतर सुद्धा काही विद्यार्थी परीक्षेला बसू इच्छित असले तर त्यांची नावे परीक्षेच्या वेळी परीक्षा साहित्याबरोबर येणाऱ्या यादीत लाल शाईने लिहून उत्तर पत्रिका परत करताना परीक्षेची फी मात्र रु. १००/– प्रत्येकी याप्रमाणे पाठवावी.

९) उत्तरपत्रिका पाठविताना इयत्तावार व माध्यमवार दिलेल्या कागदी पिशव्यांतूनच पाठवाव्यात. **उत्तरपत्रिकांची घडी घालू नये. तसेच त्यांना दोरा बांधून वर्तमानपत्रातही बांधू नयेत.** न वापरलेल्या उत्तरपत्रिका त्यासाठी दिलेल्या वेगळया कागदी पिशवीत द्याव्यात.

वरील सर्व साहित्य सोमवार, दि. ३१ जुलै २०१७ रोजी व मंगळवार दि. १ ऑगस्ट २०१७ रोजी मंडळाच्या कार्यालयात सकाळी ११ ते ३ या वेळात आणून दयावे. त्या सोबत भरलेल्या फी ची पावती पाठविली जाईल.

१०) सोबत जोडलेले फॉर्मस योग्यप्रकारे भरुन याद्यांबरोबरच न विसरता पाठवावेत.

११) परीक्षेसंदर्भात सर्व पत्रव्यवहार शाळेमार्फतच केला जाणे आवश्यक आहे.

१२) **परीक्षेचा निकाल मंडळाच्या वेबसाईटवर दि. १४ सप्टेंबर २०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता जाहीर केला जाईल.** छापील निकाल शाळांकडे दि. २१ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २०१७ या दरम्यान पाठविला जाईल. निकाल घेण्यासाठी मंडळाकडे प्रतिनिधी पाठविण्याची आवश्यकता नाही.

१३) ८० पेक्षा अधिक गुण मिळवून केंद्रातून पहिल्या येणाऱ्या विद्यार्थ्याला पुरस्कार म्हणून पुस्तक देण्यात येईल.

१४) अधिक माहितीसाठी **श्रीमती शोभना नेने – ९८६९२२४३४६** किंवा **श्रीमती शिल्पा अभ्यंकर – ९८७०१ ४४४८६** यांच्याशी किंवा कार्यालयाशी संपर्क साधावा. वेळ सकाळी ११ ते ३.

१५) मागील आठ वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचे संच मराठी आणि इंग्रजी माध्यम विक्रीसाठी मंडळाच्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

१६) **कृपया शाळेचा ई–मेल आय. डी. आणि परीक्षेचे काम पाहणाऱ्या संबंधित शिक्षकाचे नाव, ई–मेल आय.डी. व फोन नंबर न विसरता द्यावेत.**

१७) **महत्त्वाची सूचना : या परिपत्रकासोबत उत्तरपत्रिकेची नमुना प्रत पाठवित आहोत. कृपया सदर बाब परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावी.**

**सदर उत्तरपत्रिकेची नमुना प्रत मंडळाच्या वेबसाईटवर प्रकाशित केली आहे.**

**आपल्या विश्वासू ,**

**श्रीमती शोभना नेने**
***अध्यक्ष***
बृ. मुं. ग. अ. मंडळ, मुंबई

**श्रीमती शिल्पा अभ्यंकर**
***कार्यवाह***
बृ. मुं. ग. अ. मंडळ, मुंबई